

# अणजूरचा सिद्धिविनायक




प्रवीण कदम

वसई प्रांतावर सन १५३३ पासून पोर्तुगीजांचा अंमल होता. वसईसोबतच कल्याण, ठाणे, मुंबई आणि रेवदंडा या भागावर पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. सन १६६१-६२ मध्ये इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स व पोर्तुगालची राजकन्या इन्फंटा कॅथरिन यांच्या विवाहानिमित्त पोर्तुगीजांनी मुंबई इंग्रजांना आंदण म्हणून दिली. पण ठाणे, कल्याण आणि रेवदंडा भागात पोर्तुगीजांची सत्ता सुरूच राहिली. पोर्तुगीजांनी इथल्या जनतेवर धर्मप्रचाराच्या नावाखाली अनेक अत्याचार केले. अनेक स्थानिक लोकांची वतने हिरावून घेतली. या जाचाला कंटाळून येथील प्रांत पोर्तुगीजांपासून मुक्त करण्यासाठी कल्याणजवळच्या गंगाजी नाईक या सरदारांनी प्रयत्न सुरू केले. नाईक घराण्याचे मूळ आडनाव राणे असे होते. बिंबदेव राजाच्या काळात त्यांना 'नाईक' ही पदवी मिळाली. वांद्रे येथील हे घराणे कालांतराने कल्याण येथील अणजूर गावी स्थायिक झाले होते. त्यांनी छत्रपती संभाजीराजांच्या काळापासून वसई प्रांताच्या सुटकेसाठी योजना आखल्या होत्या.

आपल्या कार्याला सिद्धिविनायकाचा आशीर्वाद मिळावा म्हणून गंगाजींनी २१ दिवसांचा उपवास केला. तेव्हा गणपतीने त्यांना दृष्टांत देऊन चिंचवडला मोरया गोसावींकडे जाण्यास सुचविले. दृष्टांतास अनुसरून सन १७१८ मध्ये ते अडचणींवर मात करीत मोरगावला चालत गेले. तेथे मोरया गोसावींचे पणतू चिंतामणी यांनी त्यांना अनुग्रह दिला आणि आपल्या पूजेतील उजव्या सोंडेची गणपतीची मूर्ती दिली. पुढे सन १७२० मध्ये पेशव्यांनी कल्याण काबीज केल्यावर त्यांच्या वसई मोहिमेला यश येण्याची चिन्हे दिसू लागली. १६ मे १७३९ रोजी पहिल्या बाजीरावांचे बंधू चिमाजी आप्पा यांनी पोर्तुगीजांचा पराभव करून वसई किल्ला आणि आजूबाजूचा प्रांत जिंकून घेतला.

वसईच्या विजयानंतर सन १७४१ मध्ये गंगाजींनी मोरगाव येथून आणलेल्या गणपती मूर्तीची आपल्या अणजूर येथील राहत्या एकमजली माडीमध्ये मार्गशीर्ष शु. ६ (चंपाषष्ठी) या मुहूर्तावर प्रतिष्ठापना केली. हीच माडी आज 'अणजूरकर नाईकांचा वाडा' म्हणून प्रसिद्ध आहे. ठाणे-नाशिक रस्त्यापासून तीन किलोमीटरवर अणजूर गावातील माडीच्या तळमजल्यावर शिसवी लाकडाच्या मखरामध्ये या मूर्तीची स्थापना केलेली आहे. लाकडी मखराच्या खांबांवर सिंहाची पितळी शिल्पे आहेत. मखराच्या बाहेर काचेच्या तावदानात दोन मोठ्या समया सतत तेवत असतात. लाकडी मखराच्या आत एक दालन असून त्या दालनात चौरंगावर पितळी मखरामध्ये उजव्या सोंडेच्या आठ इंच उंचीच्या मूर्तीचे आसन आहे. मूर्तीच्या गळ्यात मोत्यांचे सर आहेत. पितळी मखराच्या चार खांबांवर सुंदर घुमट आहे. अणजूरकर घराण्याचे हे खासगी देवस्थान असल्याने देव्हाऱ्यात इतर मूर्तीही आहेत.

हा वाडा पेशवेकालीन स्थापत्याचा दुर्मिळ नमुना आहे. वाड्याचे बांधकाम लाकडी खांब, लाकडी तुळया आणि लाकडी फळ्यांचा वापर करून झालेले आहे, तर छत कौलारू आहे. वाड्यामध्ये खुंट्या, देवळ्या, कोनाडे, लाकडी जिने असे अनेक जुने घटक पाहायला मिळतात. वाड्याचा लाकडी दरवाजा, त्याची चौकट, खांब आणि त्यावरील भारवाहक, तुळया यांच्यावरील नक्षीकाम पेशवेकाळाची साक्ष देते. भिंतीवर काही चित्रे लावलेली आहेत. त्यात कै. विनायक गणपतराव नाईक यांनी १९३४ मध्ये संकलित केलेली 'नाईक इनामदार (अणजूरकर) घराण्याची वंशावळ' आहे. गंगाजी नाईक यांचे चित्र आहे.

नाईकांच्या या माडीभोवती भिंतीचे कुंपण असून माडीच्या शेजारीच जुना तलाव आहे. नाईकांच्या वंशजांनी श्री सिद्धीविनायक देवस्थान ट्रस्टची स्थापना केली असून त्याच्या विश्वस्त मंडळाकडून या देवस्थानाची देखभाल होत असते. http://www.siddhivinayakanjur.org या संकेतस्थळावर अद्ययावत माहिती मिळू शकते.

**कसे जाल?** भिवंडी तालुक्यातील अणजूर गावी जाण्यासाठी ठाणे आणि भिवंडी येथून एसटी उपलब्ध आहेत. ठाणे रेल्वे स्थानकाजवळच्या उड्डाणपुलावरून टीएमटीची बस क्र. ८७ अलिमघरपर्यंत जाते. अलिमघरच्या एक कि.मी. आधी अणजूर गाव येते. माणकोली ते अणजूर शेअर रिक्षा देखील मिळतात. खासगी वाहने थेट वाड्यापर्यंत जातात. ठाणे-नाशिक रस्त्यावरून हॉटिल लोटसजवळ अणजूर गावात जाण्यासाठी फाटा आहे. तिथून तीन कि. मी.वर वाडा आहे.

महामुंबईचे षड्दर्शन
इतिहाससाक्ष

मटा @६०